# DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY,
## CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (Formerly "Aurangabad")
## PIN-431004, Maharashtra State (India)
## NAAC – Reaccredited "A" Grade

EPABX :- (0240) 2403399 to 400
Off. Tele :- (0240) 2403112/114
Registrar :- (Offi.) (0240) 2403333
(Resi.) (0240) 2400264
Fax :- (0240) 2403113 / 2403335
Web Site :- www.bamu.ac.in
E-mail :- vc@bamu.ac.in

UNIVERSITY CAMPUS
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431004
(Formerly "Aurangabad")
(Maharashtra) INDIA

Date: - 03/04/2024

**DECLARATION**

This is to declare that Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Address: University Campus, Jaisingpura, Near Soneri Mahal, Chhatrapati Sambhajinagar (Formerly 'Aurangabad'), Maharashtra – 431004 adheres to the provisions of Statutory Regulatory Authorities (SRA – Like UGC, AICTE, MCI, DCI, INC, AYUSH, PCI, RCI, BCI and others) as applicable to the institution, and also undertake to adhere to changes, if any, from time to time.

Further this is to declare that:

A. The institution has valid approval / University affiliation for all the programme offered by the institution.
B. The institution has obtained necessary approval / permission / recognition from appropriate SRA as under law and is valid / applied for renewal as applicable.
C. The information / responses provided in IIQA online are genuine and valid.
D. At the time of submission of IIQA, it is certified that the institution is not debarred of made ineligible for further renewal of affiliation /recognition etc., by any competent authority / court of Law.
E. The students who have graduated from this Institution have been issued degree / PG certificate from the legally designated authorities.
F. No Government body has declared the institution as an illegal entity.
G. The institution undertakes to inform NAAC of any changes in the status indicated during / after submission of IIQA & thereof i.e., till the validation of the accreditation status bestowed upon them.
H. The IIQA has been prepared & submitted online from within the institution with an IP address 192.168.3.91 of computer belonging to the Institution.
I. Acceptance of IIQA by NAAC is only provisional and the onus of adhering to eligibility norms lies with the Institution
J. Institutional website is fully functional.

In case information provided is found to be contrary to the fact, it shall result in cancellation of NAAC grading, along with initiation of legal action. *It will be the total responsibility of the Institution to substantiate claims made by the Institution in its application to the satisfaction of NAAC when ever called for.*

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar *

**Professor Walmik Sarwade**
**Pro Vice-Chancellor**

**Professor Vijay Fulari**
**Vice-Chancellor**

Date : 03/04/2024

***Note : The above declaration will be displayed in the website of institution from the date of submission of IIQA till the accreditation by NAAC is valid***

# DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY,
## CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (Formerly "Aurangabad")
## PIN-431004, Maharashtra State (India)
## NAAC – Reaccredited "A" Grade

EPABX :- (0240) 2403399 to 400
Off. Tele :- (0240) 2403112/114
Registrar :- (Offi.) (0240) 2403333
(Resi.) (0240) 2400264
Fax :- (0240) 2403113 / 2403335
Web Site :- www.bamu.ac.in
E-mail :- vc@bamu.ac.in

UNIVERSITY CAMPUS
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431004
(Formerly "Aurangabad")
(Maharashtra) INDIA


## CERTIFICATE

This is to certify that in accordance with the Maharashtra State Government Gazette issued by the Higher & Technical Education Department, Government of Maharashtra under MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2023, An Ordinance Further to Amend the Maharashtra Public Universities Act, 2016, and as per the Letter from Higher & Technical Education Department, Government of Maharashtra No. Bruhat-2023/Pra.Kra.5/Vishi-5 dated 25.10.2023, the following changes have been made:

1. The city formerly known as "Aurangabad" has been officially renamed to "Chhatrapati Sambhajinagar".
2. The city formerly known as "Osmanabad" has been officially renamed to "Dharashiv".

As a result of these amendments, "Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad" replaces with "Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhajinagar".

A copy of the published Gazette is attached herewith for your convenience and reference.

Date : 03/04/2024

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, * Chhatrapati Sambhajinagar *

Professor Prashant Amrutkar
Registrar

Registrar
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,
Chhatrapati Sambhajinagar

Registrar Dr. BAMU <registrar@bamu.ac.in>

# औरंगाबाद चे नाव "छत्रपती संभाजीनगर" व उस्मानाबाद चे नाव "धाराशिव" करणेबाबत

1 message

**SharadSarjerao Kokate** <vishi5.hted-mh@mah.gov.in> Wed, Oct 25, 2023 at 12:19 AM
To: registrar@bamu.ac.in, vc@bamu.net, vc@bamu.ac.in
Cc: AJIT MADHUKARRAO BAWISKAR <ajit.baviskar@nic.in>

Please see the letter attached herewith

**2 attachments**

Gazettee 20 Oct 2023.pdf
94K

05 25.10.2023 औरंगाबाद चे नाव "छत्रपती संभाजीनगर" व उस्मानाबा.pdf
433K

Registrar
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,
Chhatrapati Sambhajinagar

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक - ४२२,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र - ०२२-२२७९३१७१ Email ID : vishi५.hted-mh@mah.gov.in

क्र.बृहत -२०२३ /प्र.क्र.५ /विशि-५ दिनांक : २५.१०.२०२३

प्रति,

कुलसचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

विषय : औरंगाबाद चे नाव "छत्रपती संभाजीनगर" व उस्मानाबाद चे नाव "धाराशिव" करणेबाबत

संदर्भ : आपले दि.०४.१०.२०२३ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने शासनाने दि.२० ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र अध्यादेश क्र.८ व्दारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या अनुसूची मधील भाग एक मधील अनुक्रमांक ४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व स्तंभ २ मधील "औरंगाबाद" ऐवजी "छत्रपती संभाजीनगर" व "उस्मानाबाद" ऐवजी "धाराशिव" असा बदल करण्यात आला आहे.

तरी, या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(अजित म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत- वरीलप्रमाणे

Urgent

GAD
पुढील उचित व तात्काळ कार्यवाहीसाठी
Bathale 25/10/2023

डॉ. जोशी
तात्काळ कार्यवाही करावी
25/10/23

Registrar
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,
Chhatrapati Sambhajinagar

RNI No. MAHBIL/2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ९, अंक ३९] शुक्रवार, ऑक्टोबर २०, २०२३/आश्विन २८, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. (१-४)

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २० ऑक्टोबर २०२३.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2023.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

२०१७ चा महा. ६ **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;



Registrar
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar

**त्याअर्थी, आता**, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात त्यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १०९ मध्ये,— २०१७ चा महा. ६.

(१) पोट-कलम (३) मधील, खंड (छ) मध्ये, दुसरे परंतुक व तक्ता याऐवजी, पुढील परंतुक व तक्ता दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षासाठी, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी इरादा पत्र मागण्याकरिता अर्ज करण्याचे, अधिष्ठाता मंडळाद्वारे अर्जांची छाननी करण्याचे व ते राज्य शासनाकडे पाठविण्याचे आणि राज्य शासनाकडून इरादापत्र देण्याचे दिनांक वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) व (घ) यामध्ये निर्दिष्ट केलेला दिवस किंवा दिनांक हे, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येतील :—

**तक्ता**

| खंड | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक | २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (क) | ज्या वर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी | १५ नोव्हेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी ; |
| (ग) | ज्या वर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी | ३१ डिसेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी ; |
| (घ) | विद्यापीठाच्या शिफारशीनंतर, लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी | १५ फेब्रुवारी २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी."; |

(२) पोट-कलम (४) मधील, खंड (घ) मध्ये, दुसरे परंतुक व तक्ता याऐवजी, पुढील परंतुक व तक्ता दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षासाठी, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरू करण्यासाठी परवानगी मागण्याकरिता राज्य शासनाकडे अर्ज करण्याचा दिनांक वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (४) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेला दिवस हा, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येईल :—

**तक्ता**

| खंड | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिवस | २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (क) | ज्या वर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी | १५ नोव्हेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी.". |

Registrar
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar

३. मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची क मधील भाग एक मध्ये, अनुक्रमांक ४ येथील नोंदीमध्ये,

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याला जोडलेल्या अनुसूची क ची सुधारणा.

(१) स्तंभ (२) मधील, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद" या मजकुराऐवजी, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) स्तंभ (२) मधील,—

(एक) नोंद (१) मधील, "औरंगाबाद" या मजकुराऐवजी, "छत्रपती संभाजीनगर" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) नोंद (४) मधील, "उस्मानाबाद" या मजकुराऐवजी, "धाराशिव" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

Registrar
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,
Chhatrapati Sambhajinagar

## निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम १०९ च्या पोट-कलम (३) मध्ये, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी इरादा पत्र देण्याकरिता अर्ज करण्यासाठी, शासनाद्वारे इरादा पत्र देण्यासाठी, छाननी केल्यानंतर विद्यापीठाद्वारे अनुपालन अहवाल राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी आणि नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्याकरिता अंतिम मान्यता देण्यासाठी कालमर्यादांची तरतूद केलेली आहे. उक्त कलम १०९ च्या पोट- कलम (४) मध्ये, नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी किंवा सॅटेलाइट केंद्र सुरू करण्यासाठी राज्य शासनाकडून परवानगी देण्यासाठी कालमर्यादेची तरतूद केली आहे.

२. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय, नवीन पाठ्यक्रम, इत्यादी सुरू करण्याच्या परवानगीसाठी विद्यापीठांना प्रस्ताव सादर करण्याकरिता, विविध विद्यापीठांच्या सम्यक आराखड्यांना अंतिमरूप दिल्यानंतर, सलग सुट्ट्यांमुळे पुरेसा वेळ उपलब्ध नव्हता याबाबत शासनाला विविध निवेदने प्राप्त झालेली आहेत. नवीन महाविद्यालय, पाठ्यक्रम, इत्यादी सुरू करण्यासाठी अर्ज करण्याचे आणि त्यानंतरच्या प्रक्रिया करण्यासाठी दिनांक वाढविण्याच्या विनंत्या, अशा निवेदनांमध्ये अंतर्भूत आहेत.

म्हणून, २०२४-२०२५, या शैक्षणिक वर्षासाठी, नवीन महाविद्यालय, पाठ्यक्रम, इत्यादी सुरू करण्यासाठी अर्ज करण्याकरिता, अधिसभा मंडळाद्वारे अशा अर्जांची छाननी करण्यासाठी व ते राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी आणि राज्य शासनाकडून इरादा पत्र देण्यासाठी नवीन वेळापत्रक विनिर्दिष्ट करणे इष्ट आहे असे वाटते.

३. महाराष्ट्र शासनाने, अनुक्रमे, 'औरंगाबाद' व 'उस्मानाबाद' या महसुली क्षेत्रांच्या नावांमध्ये केलेला बदल विचारात घेऊन, उक्त अधिनियमाच्या अनुसूची क च्या भाग-एक मध्ये अंतर्भूत असलेल्या, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद" या नावाऐवजी, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर" हे नाव आणि "औरंगाबाद" व "उस्मानाबाद" या जिल्ह्याच्या संदर्भाऐवजी, "छत्रपती संभाजीनगर" व "धाराशिव" हे संदर्भ दाखल करणे देखील इष्ट आहे असे वाटते.

४. वरील प्रयोजनांसाठी, उक्त अधिनियमाच्या उक्त कलम १०९ मध्ये व अनुसूची क मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १९ ऑक्टोबर २०२३

**रमेश बैस,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Registrar
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,
Chhatrapati Sambhajinagar